# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०३/२०२४ (गुरूवार)सकाळ


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २८/०३/२०२४चे ०७.३० वा. दरम्यानपोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरीता पेट्रोलिंग करीत असतानामिळालेल्या गोपनीय सुत्रानुसारमौजा मारोडी येथे आरोपी नामे—गजानन आत्माराम कडव, रा. चिरवा ता. मौदा हा आपल्या ताब्यातील विना क्रमांकचा ट्रॅक्टर व विना क्रमांकाची ट्रॉली मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती अवैधरीत्या व विनापरवाना भरून चोरटी वाहतूक करतांना मिळुन आल्याने रेतीचे रॉयल्टीबाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून लाल रंगाचा विनाक्रमांकचा ट्रॅक्टर किंमती ४००,०००/—रू. व त्यामधील ०१ ब्रास रेती किंमती ४०००/—रू. असा एकुण ४,०४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून **ट्रॅक्टर चालक/मालक नामे—गजाननआत्माराम कडव, रा. चिरवा, ता. मौदा वय ४२ वर्ष, रा. चिरवा ता. मौदा** याचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भादंवि.सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, पोहवा अनिल कोकोडे, नागेश वाघाडे, पोलीस अंमलदार सचिन हटवार यांनी पार पाडली.



<u>**अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक**</u>

<u>पो.स्टे. मौदा</u> :— दिनांक २७/०३/२०२४ चे ०२.१५ वा. ते ०३.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करित असताना गोपनीय माहिती मिळाली की, महालगाव येथे राहणारा **आरोपी नामे—अमित व्यंकट लचपटवार, वय २४ वर्ष, रा. ईदीरा नंगर महालगाव ता. कामठीहा स्वत:चे राहते घरी अवैधरीत्या घातक शस्त्र (तलवार) बाळगुन आहे. यावरून नमुद आरोपीचे घराची घरझडती घेतली असता आरोपीचे राहते घरात विना मुठेची जंग लागलेली जुनी लोखंडी तलवार किंमती १००/—रु चा मुद्देमालअवैधरीत्या मिळुन आल्याने ती जप्त करून आरोपी नामे—अमित व्यंकट लचपटवार याचेविरूद्ध पोस्टे मौदा येथे अप. क्र. ३७१/२४ कलम ४,२५ शस्त्र अधि. सहकलम १३५ म.पो.अधिअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले, पोलीस हवालदारसंदीप कडु, गणेश मुदमाळी, रूपेश महादुले, पोलीस नायक दीपक दरोडे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**